-१३५-

वाचले :- १) श्री. खंडू रडा महाजन रा. मुडावद ता.शिंदखेडा यांचा दि. ११/१०/१९९० चा अर्ज.
२) उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांचे शेवट होणारे पत्र क्र.जमीन/कावि/५९६/२०००, शिरपूर दिनांक १३/१०/२०००.
३) महाराष्ट्र जमीन महसूल सरकारी जमीनीची विल्हेवाट नियम१९७१ मधील नियम ३४ अन्वये

क्र.ब/कक्ष-२/गावठाण/कावि- १०३७
जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे
दिनांक:- २७ / ११ / २०००

## आ दे श

श्री. खंडू रडा महाजन रा. मुडावद ता.शिंदखेडा यांनी मौजे मुडावद येथील ग.नं. १९२ पैकी ६० X ७० = ४२०० स्के.फु. ( ३९०-३३ चौ.मी. ) जागेची धान्य मळणी यंत्रासाठी कब्जाहक्कावर मिळणे बाबत मागणी केली आहे.

चौकशी अंती प्रश्नाधिन जागा महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीनीचे वितरण ) नियम १९७१ मधील नियम ३४ चे तरतूदीनुसार जाहीर लिलावाने ५ वर्षे मुदतीच्या भाडेपट्टयाने देण्या बाबत मी जिल्हाधिकारी,धुळे खालील शर्तीवर याव्दारे आदेश देत आहे.

मौजे मुडावद ता.शिंदखेडा येथील ग.नं. १९२ पैकी :- भाडेपट्टा प्रतिवर्षी रु. ९२५.०० मात्र अधिक
६० X ७० = ४२०० स्के. फुट जागा लोकफंड.

## शर्ती

१) महाराष्ट्र जमीन महसूल व त्या नियमाचे तरतूदीनुसार तहसिलदार, शिंदखेडा यांनी प्रश्नाधिन जागेचा जाहिर लिलाव करावा.
२) या लिलावात मुडावद ता.शिंदखेडा येथील रहिवाशींनी लिलावाचे बोलीस बोलता येईल.
३) सर्वात जास्त बोली बोलणा-या इसमाकडून लिलावाचे दिवशी भाडेपट्टयाच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम सरकार जमा करावी तसे न केल्यास सदरचा लिलावा रद्द करण्यात येईल.
४) सदरच्या लिलावास म.जिल्हाधिकारी, धुळे यांची अंतिम मंजूरी घ्यावी लागेल.
५) प्रश्नाधिन जमीनीचा उपयोग धान्य मळणी यंत्रासाठी वापर करावा.
६) भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर वेळोवेळी भाडेपट्टयाची मुदत वाढवून घ्यावी.
७) भाडेपट्टा दराने विहित नमून्यांत करारनामा करुन घ्यावा.
८) प्रश्नाधिन जागेवर भाडेपट्टाधारकाने कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
९) भाडेपट्टादराने भाडेपट्टयाची रक्कम प्रतिवर्षी नियमित सरकार जमा करावी.
१०) वरील पैकी पट्टेदाराने कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास सदरची जागा काढुन घेण्यात येईल.

सही / X X X
**( संजय सेठी )**
**जिल्हाधिकारी, धुळे**

१०१४१
२७-११-२०००

प्रत :- तहसिलदार, शिंदोडा याचेकडेस मूळ कागदपत्रासह कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२/- सोबत मूळ कागदपत्र संचिका पानांक १ ते १३३ जोडली आहे.

**जिल्हाधिकारी, धुळे करिता**

TRUE COPY
Coppy applicant on 30/10/09 of words........
Coppy ready on 6/11/09 Copping Fee ........
Coppy Received 6/11/09 comparing Fee ........
Copied by ........ per Fee........
Checked by ........ Total ........

विठोबा शिकळे पाटील